दै. सत्यवादी ता. ३०।११।८९ पान-३

# नियतकालिक स्पर्धेत कमला कॉलेजचे सयश

कोल्हापूर, ता. २९- शिवाजी विद्यापीठ नियतकालिक स्पर्धा सन १९८८-८९ मध्ये कमला कॉलेजच्या "कमला" नियतकालिकाला दोन पारितोषिके प्राप्त झाली. यापैकी इंग्रजी विभागात 'समीक्षा" प्रकारातील दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक हे कु. विशाखा अ. शिंदे (तृतीय वर्ष साहित्य) हिच्या 'लॉर्ड ऑफ दि फ्लाईज एज आय एक्सिरिएन्स' ह्या लेखास मिळाले; तर छायाचित्र विभागातील दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक कु. निशा मांडवले हिच्या 'निष्पर्ण तरूतळी सागर सान्निध्य शांत' ह्या चित्रास मिळाले. विजेत्या विद्यार्थिनींचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.